मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सव्वातीन लाख करदात्यांनी घेतला सवलतीचा लाभ

## 1 जुलैपासून पालिका आकारणार 2 टक्के विलंब शुल्क : तब्बल 408 कोटी 73 लाख रुपयांचे कर संकलन



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्ताधारकांसाठी महापालिकेने ३० जून २०२५ पर्यंत विविध कर सवलती जाहीर केल्या आहेत. आतापर्यंत जवळपास सव्वा तीन लाख नागरिकांनी य सवलतींचा लाभ घेतला आहे. आता या सवलतींचा लाभ घेण्यासाठी अवघे पाच दिवस शिल्लक असून नागरिकांनी चालू आर्थिक वर्षातील तसेच थकीत कर भरावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने मालमत्ता धारकांसाठी ३० जून २०२५ पर्यंत संपूर्ण कराचा भरणा ऑनलाइन स्वरूपात केल्यास १० टक्के सवलत व कुटुंबातील महिलेच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेवर ३० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येत आहे. यासोबतच, आतापर्यंत ३२ हजार ५०५ थकबाकीदारांना जप्तीपूर्वीची नोटीस देखील बजाविण्यात आली आहे.

१ एप्रिल २०२५ पासून आतापर्यंत सुमारे ३ लाख १८ हजार मालमत्ताधारकांनी आपला कर भरून विविध सवलतींचा लाभ घेतला आहे. यामुळे चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत तब्बल ४०८ कोटी ७३ लाख रुपयांचा कर संकलित झाला आहे. यामध्ये १० टक्के सवलतीचा लाभ घेणाऱ्या मालमत्ताधारकांची संख्या जवळपास २ लाख ३२ हजार ७६ असून त्यांनी ऑनलाईन भरणा केलेल्या कराची रक्कम २४६.१८ कोटी आहे.

तसेच ज्या मालमत्ताधारकांनी धनादेशाद्वारे कराचा भरणा केला, परंतू त्यांचे धनादेश वटले नाहीत, अशा मालमत्तांवर लवकरच जप्तीची कारवाई केली जाणार आहे. यामध्ये न वटलेल्या धनादेशांची एकूण रक्कम ९ कोटी १५ लाख रुपये इतकी असून मालमत्ताधारकांनी ३० जूनपूर्वी आपला मालमत्ता कर ऑनलाईन किंवा रोख स्वरूपात भरावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

### 19 हजार 651 थकबाकीदारांकडून कर वसुली

» करसंकलन विभागाने कर वसुलीसाठी विविध माध्यमातून जनजागृती केल्याने आतापर्यंत सुमारे १९ हजार ६५१ थकबाकीदारांकडून ४० कोटी ३३ लाखांचा करसंकलीत झाला आहे. त्यासोबतच ऑनलाइन कर भरणाऱ्यांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

“ पिंपरी चिंचवड शहरातील करदात्यांनी सवलत योजनेस उत्तम प्रतिसाद दिला असून सवलतीचा लाभ घेतला आहे. परंतू अद्यापही ज्या मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला नाही, अशा मालमत्ताधारकांना सवलत घेण्याची शेवटची संधी आहे. त्याबरोबरच जे या तिमाहीमध्ये कराचा भरणा करणार नाहीत, अशा मालमत्ताधारकांच्या करावर पुढील महिन्यापासून विलंब दंड लागू होणार आहे. थकबाकीदारांच्या मालमत्ता सुध्दा जप्त करण्याची मोहिम हाती घेण्यात येणार आहे. नागरिकांनी तात्काळ कराचा भरणा करुन सवलतीचा लाभ घ्यावा.

**- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# हिंजवडीचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश व्हावा

## आमदार शंकर जगताप यांचा ठाम पाठिंबा : नागरिकांच्या आंदोलनाला आता राजकीय पाठबळही



**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडीचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश व्हावा, या मागणीसाठी सुरू असलेल्या ऑनलाईन सह्यांच्या मोहिमेला आता राजकीय पाठबळ मिळाले आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी या मोहिमेला ठाम शब्दांत पाठिंबा जाहीर केला असून, "या प्रश्नावर मी हिंजवडीतील नागरिकांच्या सोबत आहे," अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली आहे.

हिंजवडी आयटी पार्क परिसरात सध्या नागरिक व कर्मचारी रस्त्यांची अत्यंत खराब अवस्था, वाहतूक कोंडी आणि अपुऱ्या नागरी सुविधा यामुळे त्रस्त झाले आहेत. या गंभीर समस्यांवर कायमस्वरूपी उपाय व्हावा, यासाठी वाकड-पिंपरी चिंचवड रहिवासी विकास व कल्याण संस्थेचे (WPRDWA) अध्यक्ष सचिन लोंढे यांच्या पुढाकाराने #UNCLOG HINJAWADIITPARK या मोहिमेंतर्गत ऑनलाईन सह्यांची मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेमार्फत हिंजवडीचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश व्हावा, अशी जोरदार मागणी केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार शंकर जगताप यांनी म्हटले की, “हिंजवडीतील नागरिक आणि आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे प्रश्न मी समजून घेतले आहेत. या भागातील नागरी सुविधांची अवस्था अत्यंत वाईट असून, त्यावर पालिकेच्या माध्यमातूनच प्रभावी उपाय होऊ शकतात. म्हणूनच मी या मागणीचे पूर्ण समर्थन करतो आणि यासंदर्भात प्रशासनाकडेही पाठपुरावा करणार आहे.”

ऑनलाईन सह्यांची ही मोहीम नागरिकांच्या सहभागामुळे दिवसेंदिवस बळकट होत आहे. यामध्ये सहभागी झालेले नागरिक सांगतात की, हिंजवडीसारखा आयटी हब महानगरपालिका क्षेत्रात आला तर रस्ते, वाहतूक, पाणी, कचरा व्यवस्थापन यासारख्या मूलभूत सुविधा अधिक सक्षम होतील. यामुळे लाखो कर्मचाऱ्यांना दिलासा मिळेल, तसेच आयटी उद्योगांच्या विकासालाही चालना मिळेल.

या मागणीला आता आमदार शंकर जगताप यांचा पाठिंबा मिळाल्यामुळे या आंदोलनाला नवे राजकीय वजन प्राप्त झाले आहे. लवकरच या मागणीसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि नगरविकास विभागाकडे अधिकृत निवेदन देण्यात येणार असून, नागरिक प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा करत आहेत.

# पुणे मेट्रोच्या फेज 2 विस्ताराला केंद्राची मंजूरी

## मेट्रो रेल प्रकल्प फेज-2 मध्ये 13 नवीन स्थानके; 3626.24 कोटी रुपयांना केंद्राची मंजूरी

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत पुणेकरांना आनंदाची बातमी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पुणे मेट्रो लाईन 2 योजनेसाठी 3626 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. तसेच या बैठकीमध्ये आणीबाणीबाबतचा ठराव देखील मंजूर करण्यात आला आहे.



याचबरोबर आणीबाणीच्या काळात लढलेल्या योद्ध्यांचाही सन्मान करण्यात आला. तर दुसरीकडे या बैठकीत पुनर्वसनासाठी झरिया कोलफिल्ड-सुधारित मास्टर प्लॅनलाही मंजुरी देण्यात आली आहे. ही योजना पूर्ण करण्यासाठी 5940 कोटी रुपये खर्च केले जातील. याशिवाय उत्तर प्रदेशात आग्रा आंतरराष्ट्रीय पोटॅटो सेंटरची स्थापना केली जाईल. ते बांधण्यासाठी 111.5 कोटी रुपये खर्च येईल.

पुणे मेट्रो लाईन 2 योजनेसाठी 3626 कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून हा खर्च केंद्र सरकार, राज्य सरकार आणि आंतरराष्ट्रीय संस्था समान वाट्याने करणार आहे. या प्रोजेक्टमध्ये दोन नवीन कॉरिडॉर जोडले जाणार आहे. वनाज ते चांदणी चौक (कॉरिडॉर 2अ) आणि रामवाडी ते वाघोली/विठ्ठलवाडी (कॉरिडॉर 2ब).

### साल 2057 पर्यंत 3.49 लाख प्रवासी संख्या

या प्रकल्पाच्या पूर्ततेनंतर या मेट्रो मार्गिका लाईन – 2 ची एकूण प्रवासी संख्या साल 2027 पर्यंत 0.96 लाख होईल तर साल 2037 पर्यंत 2.01 लाख, साल 2047 पर्यंत 2.87 लाख आणि साल 2057 पर्यंत 3.49 लाख होणार आहे. या मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड ( महा मेट्रो ) अंतर्गत होत आहे.

### कसा असेल नवा मार्ग?

हे दोन उन्नत कॉरिडॉर 12.75 किमी लांबीचे असतील आणि त्यात 13 स्टेशन असतील, जी चांदणी चौक, बावधन, कोथरूड, खराडी आणि वाघोली यासारख्या जलद-विकसनशील उपनगरांना जोडतील. हा प्रकल्प चार वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

### 13 नवीन स्थानके

» एकूण 12.75 किमी लांबीच्या या नवीन मेट्रो लाईनमध्ये 13 नवीन स्थानके असणार आहे. ही स्थानके चांदणी चौक, बावधन, कोथरूड, खराडी आणि वाघोली सारख्या वेगाने विकसित होणाऱ्या उपनगरांना जोडतील. हा प्रकल्प चार वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. हा विस्तार मेट्रोद्वारे पुणे शहराच्या पूर्व आणि पश्चिमेला थेट जोडेल, ज्यामुळे पौडे रोड आणि नगर रोड सारख्या प्रमुख रस्त्यांवरील वाहतुकीचा भार कमी होईल.

### महामेट्रो बांधकाम काम करणार

» या प्रकल्पाच्या बांधकाम आणि इलेक्ट्रोमेकॅनिकल सिस्टीमशी संबंधित सर्व कामे महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) ची जबाबदारी असणार आहे. सध्या या प्रोजेक्ट अंतर्गत स्थलाकृतिक सर्वेक्षण आणि डिझाइनिंगसारखी प्राथमिक कामे आधीच सुरू झाली आहेत.

# महापालिकेच्या तिजोरीत 932 कोटींचा महसूल

## मिळकतकराचे 932 कोटी जमा, सवलतीसाठी 30 जूनपर्यंत मुदत; पाच ते दहा टक्के सवलत

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेचा मिळकतकर भरताना सवलत मिळविण्यासाठी सहा दिवस बाकी राहिले असून, आतापर्यंत सवलतीचा फायदा घेऊन ९३२ कोटी रुपयांचा मिळकतकर महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. ३० जूनपर्यंत मिळकतकराची रक्कम भरणाऱ्या मिळकतदारांना बिलात पाच ते दहा टक्के सवलत दिली जाणार आहे.




महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत म्हणून मिळकतकर विभागाकडे पाहिले जाते. यंदाच्या चालू आर्थिक वर्षामध्ये मिळकतकर विभागाला ३२५० कोटी रुपयांचा महसूल गोळा करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. महापालिकेने सुरुवातीचे दोन महिने मिळकतकर भरणाऱ्यांना सर्वसाधारण करात पाच ते दहा टक्के सवलत दिली आहे. याचा फायदा घेऊन आतापर्यंत ५ लाख ७९ हजार ५८८ जणांनी सुमारे ९३२ कोटी ३९ लाख रुपयांचा महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा केला आहे.

महापालिकेकडे वेगवेगळ्या प्रकारची सुमारे १७ हजार कोटींची थकबाकी आहे. यामध्ये शहरात असलेल्या मोबाईल टॉवरच्या मिळकतकराची थकबाकी सर्वसाधारण चार हजार कोटी असून, ती सर्वाधिक आहे. त्यापाठोपाठ दुबार मिळकतकराची थकबाकी ४ हजार कोटींच्या घरात आहे. महापालिकेने जादा मिळकतकर आकारल्याने न्यायालयात दावे दाखल असलेल्या मिळकतकराची दीड हजार कोटींची, तर महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील १९०० कोटींची थकबाकी आहे.

### मिळकतकर भरण्याचे प्रकार मिळकतदारांची संख्या जमा रक्कम (कोटी)

» ऑनलाईन ४ लाख २ हजार ७९८ ५८२.४१
» रोख रक्कम १ लाख १३ हजार ७८० ९९. ४९
» धनादेश, डीडी ६२ हजार ९२० २५०.४९

“ सवलतीच्या दरात मिळकतकर नागरिकांना भरण्याची मुदत ३० जूनपर्यंत आहे. नागरिकांना त्याचा फायदा घेता यावा, यासाठी ऑनलाइन, महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तसेच महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अंदाजपत्रकात दिलेले उद्दिष्ट गाठण्यासाठी थकबाकी वसुलीसाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

**- अविनाश सपकाळ,**
**उपायुक्त मिळकतकर विभाग.**

### थकीत करवसुलीसाठी नियोजन

» ‘थकीत मिळकतकरापैकी दुबार आणि समाविष्ट गावांतील कराचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. जून महिना संपल्यावर थकबाकी वसूल करण्याचे नियोजन करण्यात आले आहे,’ असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.

# वृक्ष लागवड मोहीमेत सहभागी व्हा, आयुक्तांचे शहरवासियांना आवाहन

## उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाचे वृक्ष लागवड मोहिम, १.५ लाख देशी झाडांची लागवड करण्याचे उद्दिष्ट

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील सध्याच्या हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वृक्ष लागवड ही काळाची गरज बनली आहे. झाडे लावणे हे सोपे काम असले, तरी ती जगवणे आणि ती संवर्धित करणे हेच खरे कार्य आहे. प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपण मोहिमेत सहभागी होवून शहर सुंदर व हरित करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले. महापालिकेच्या उद्यान व वृक्ष संवर्धन विभागच्या वृक्षारोपण अभियानाचे उद्‌घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्या प्रसंगी सिंह बोलत होते.



यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सह शहर अभियंता देवन्ना गट्टूवार, मनोज सेठिया, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, कार्यकारी अभियंता सुनील पवार, माजी नगर सदस्य चंद्रकांत नखाते, बीआरटीचे कार्यकारी अभियंता चंद्रकांत मोरे, महापालिका उद्यान विभागाचे उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, योगेश वाळूंज, सहाय्यक उद्यान अधिक्षक राजेश वसावे, उद्यान निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे, उद्यान सहाय्यक प्रदीप गजरमाने, तसेच ग्रीन यात्रा यांच्या सह अनेक सामाजिक संघटना देखील सहभागी होत्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाच्या वतीने पर्यावरण संवर्धन आणि हरित शहर निर्माण करण्याच्या उद्देशाने वृक्षारोपण मोहीम उपक्रम हाती घेतला आहे. या वृक्षारोपण अभियानांतर्गत शहरात दीड लाख देशी झाडांची लागवड करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.. यामध्ये ताम्हण, बहावा, नीम, शिसव या वृक्षांसारख्या विविध देशी व पर्यावरणपूरक प्रजातींची झाडे लावली जाणार आहेत. तसेच अन्य देशी झाडांच्या प्रजांतीचा देखील समावेश आहे. या झाडांची निवड जैवविविधतेच्या संवर्धनासोबतच स्थानिक हवामानाशी सुसंगत राहील यासाठी करण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील सध्याच्या हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वृक्ष लागवड ही काळाची गरज बनली आहे. झाडे लावणे हे सोपे काम असले, तरी ती जगवणे आणि ती संवर्धित करणे हेच खरे कार्य आहे. प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपण मोहिमेत सहभागी होवून शहर सुंदर व हरित करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाच्या वतीने पर्यावरण संवर्धन आणि हरित शहर निर्माण करण्याच्या उद्देशाने वृक्षारोपण मोहीम उपक्रम हाती घेतला आहे. या वृक्षारोपण अभियानांतर्गत शहरात दीड लाख देशी झाडांची लागवड करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे..

> **"पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समन्वयाने हाती घेण्यात आलेल्या या वृक्ष लागवड मोहिमेस शहरातील नागरिकांसह अनेक समाजिक संघटना देखील सहकार्य करत आहेत. चला तर मग एकत्र येऊया 'आपले शहर हरीत शहर' करूया ..."**
>
> **- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका**

> **"या वृक्ष लागवड मोहिमेत उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाच्या वतीने दीड लाख देशी झाडे लावण्यात येणार आहेत. आपल्या परिसरात वृक्ष लागवड करावयाची असल्यास आम्हाला कळवा आपण एकत्रिपणे तेथे देशी वृक्षांची लागवड करू व आपल्या शहराला अधिक हरित करू.."**
>
> **- उमेश ढाकणे, सहाय्यक आयुक्त, उद्यान व वृक्ष संवर्धन विभाग, महानगरपालिका**

# पनवेल विमानतळ सप्टेंबरपासून कार्यान्वित

## एक टर्मिनल सुरू होणार, खासदार श्रीरंग बारणे यांनी घेतला आढावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल येथील लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाला वेग आला आहे. इंटर टर्मिनल कनेक्टिव्हिटी असणारा भारतातील हे पहिलेच विमानतळ असणार आहे. वार्षिक दोन कोटी प्रवासी क्षमता असलेले टर्मिनल १ सप्टेंबर २०२५ पासून सुरू होईल. येथून आंतरराज्य विमानसेवा प्राथमिक स्तरावर सुरू होणार असल्याची माहिती शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.

मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी मंगळवारी (दि. २४) प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला भेट दिली. कामाचा संपूर्ण आढावा घेतला. अधिकाऱ्यांनी कामाला गती देण्याच्या सूचना दिल्या. अदानी एअरपोर्ट विभागाच्या सीईओ मिनल नाईक, सिडको प्रोजक्ट मॅनेजर गीता पिल्ले यांनी विमानतळाच्या कामाचे सादरीकरण दिले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, जिल्हाप्रमुख अतुल भगत, शिवसेना उपजिल्हा प्रमुख विनोद साबळे, शिवसेना पनवेल महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, पनवेल शिवसेना तालुका प्रमुख रघुनाथ पाटील, उरण तालुकाप्रमुख दीपक ठाकूर, शिवसेना शहरप्रमुख प्रसाद परब, तुकाराम सरख, सुनील गोवारी, प्रसाद सोनवणे, शिवसेना उपमहानगर प्रमुख महेश सावंत, शिवसेना संपर्कप्रमुख मंगेश राणवडे, शिवसेना महिला उरण विधानसभा जिल्हा संघटिका मेधाताई दमडे व पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



खासदार बारणे म्हणाले, पुणे आणि मुंबईला जोडणाऱ्या पनवेलमध्ये हे आंतरराष्ट्रीय विमानतळ होत आहे. मेट्रो १, मेट्रो २, मेट्रो ३ यासह वॉटर टॅक्सी, स्थानिक लोकल ट्रेन सेवा आणि भविष्यातील मुंबई हैदराबाद बुलेट ट्रेन यांची थेट कनेक्टिव्हिटी आणि मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापासून नवी मुंबई विमानतळापर्यंत देखील थेट कनेक्टिव्हिटी असणार आहे. प्रदूषणरहित 'ग्रीन एअरपोर्ट' कन्सेप्ट राबविली जाणार आहे. ११५० हेक्टर इतक्या मोठ्या परिसरात एअरपोर्टचा विस्तार होत आहे. विमानात इंधन भरण्याची अंडरग्राउंड पाईपलाईनतर्फे प्रणाली कार्यन्वित केली जाणार आहे. सप्टेंबर-२०२५ पासून टर्मिनल वन सुरू होणार आहे. त्याची वार्षिक दोन कोटी प्रवासी क्षमता असणार आहे. २०२९ पर्यंत टर्मिनल टूसह जवळजवळ ८० टक्के कामकाज पूर्ण होईल असे अपेक्षित आहे. २०३६ पर्यंत चार टर्मिनल्स, एक व्हीआयपी टर्मिनल, जनरल एव्हिएशन (खासगी विमाने) देशातील सर्वांत मोठे कार्गो डेपो असे संपूर्ण विमानतळ शंभर टक्के विकसित होणार आहे. ३.७ किलोमीटरचा सर्वाधिक लांबीचा रन-वे असणार आहे. त्यावर मोठी कार्गो विमाने व एअरबस ए-३८० सारख्या विमानांचे लँडिंग आणि उड्डाण शक्य होणार आहे. मुंबईच्या सध्याच्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जवळ जवळ दुप्पट प्रवासी व विमानांच्या दळणवळणाची क्षमता आहे.

> **सप्टेंबर-२०२५ ला आंतरराज्य विमानसेवा प्राथमिक स्थरावर चालू होईल. सर्व वाहतूक व्यवस्थेला विमानसेवा जोडल्या जाणार आहेत. यामध्ये मेट्रो, भूमिगत रेल्वे, बुलेट ट्रेन या सेवेचा समावेश आहे. २०२९ पर्यंत आंतरराष्ट्रीय विमान पूर्णपणे उड्डाणे घेतील. देशातील महत्त्वाचे व मोठे विमानतळ म्हणून याकडे पाहिले जाते. विमानतळासाठी केंद्र सरकार, सिडको यांच्या माध्यमातून लागणारे सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.**
>
> **- श्रीरंग बारणे, खासदार, मावळ**

# भुलेश्वर घाटात दरड कोसळण्याची भीती

## धोकादायक दरडी व घाटातील रस्त्याच्या बाजूला पाणी वाहून जाण्यासाठी चारीमध्ये कोसळलेले दगड यामुळे घाट रस्त्यातील प्रवास धोकादायक झाला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

यंदा पावसाळा लवकर सुरू झाल्याने भुलेश्वर मंदिर परिसरात जोरदार पाऊस झाल्याने घाटातील सौंदर्य पाहण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक मंदिर पाहण्यासाठी व घाटात फिरण्यासाठी येत आहेत. मात्र, घाटातील वळणावर असलेली धोकादायक झाडे, अनेक ठिकाणच्या धोकादायक दरडी व घाटातील रस्त्याच्या बाजूला पाणी वाहून जाण्यासाठी चारीमध्ये कोसळलेले दगडी यामुळे घाट रस्त्यातील प्रवास धोकादायक झाला आहे.

मंदिरातील रेखीव, कोरीव शिल्पकाम पाहण्यासाठी, तसेच पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात निसर्गाचे सौंदर्य बहारल्याने पुणे शहर, हडपसर परिसरातील शहरी वर्ग मोठ्या संख्येने मंदिर व घाट परिसरामध्ये येत आहेत. घाटातील धबधबेही अनेक वर्षानंतर मे महिन्याच्या अखेर पासूनच प्रवाहित झाल्याने यामध्ये पर्यटक आनंद लुटत आहेत. घाटातील अनेक वळणांवर, तसेच कपाऱ्यावर, उंचावर उभे राहून पर्यटक फोटो काढताना दिसत आहेत. पावसामुळे घाटातील कड्या कपारींमध्ये पाणी गेल्याने अनेक ठिकाणी रस्त्याच्या बाजूला वारंवार दरडी कोसळत आहेत.



### घाटामध्ये पोलिस यंत्रणेची गरज

**» अनेक पर्यटक घाटातील कपारींना उभे राहून कुटुंबासह फोटो काढतात. मात्र, घाटातील या दरडी कधी कोसळतील याचा नेम नसल्याने पर्यटकांनी अशा धोकादायक ठिकाणी फोटो काढण्यासाठी टाळणे जीविताच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. यासाठी घाटामध्ये पोलिस सुरक्षा यंत्रणेने अधून मधून चक्कर मारणेही तितकेच गरजेचे आहे.**

घाटातील पहिल्या वळणापासून शेवटच्या वळणापर्यंत कमीत कमी 10 ते 15 ठिकाणी कोसळलेल्या दरडींचे दगड गोटे रस्त्याच्या बाजूला असलेल्या चाऱ्यांमध्ये पडून आहेत. यामुळे पावसाचे घाटाच्या उंचावरून पडणारे पाणी चारीतून अनेक ठिकाणी रस्त्यावर येऊन रस्त्यात राडा येण्याबरोबरच मोठ्या चाऱ्या पडल्या आहेत. यामध्ये दुचाकी चालक घसरून पडण्याची भीती तर आहेच, मात्र त्याबरोबरच चारचाकी वाहन देखील या खड्ड्यांमध्ये जाऊन दरीत कोसळण्याची भीती वाहनचालक व्यक्त करत आहेत.

घाटात अनेक ठिकाणी वळणाच्या जागेवर मोठ्या प्रमाणात झाडे वाढले असून, यामुळे समोरचे वाहन दिसत नसल्याने अपघात होण्याची दाट शक्यता आहे. त्याचप्रमाणे घाटातील पायथ्याला पहिल्याच वळणावर मागील सहा महिन्यांहून अधिक काळ एक झाड रस्त्याच्या बाजूला उन्मळून पडलेले तशाच अवस्थेत आहे. या झाडाला बाजूला करण्याची तस्ती ना सार्वजनिक बांधकाम खात्याचे कर्मचारी घेतात ना वन विभागाचे कर्मचारी घेतात. अपघात झाल्यानंतरच कर्मचारी जागे होणार की काय? असा संतप्त सवाल प्रवासी करत आहे.

घाटातील सौंदर्य पाहण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक मंदिर पाहण्यासाठी व घाटात फिरण्यासाठी येत आहेत. मात्र, धोकादायक दरडी व घाटातील रस्त्याच्या बाजूला पाणी वाहून जाण्यासाठी चारीमध्ये कोसळलेले दगडी यामुळे घाट रस्त्यातील प्रवास धोकादायक झाला आहे.

> **“ शहरापासून नजीक असणारे पर्यटन स्थळ म्हणून सध्या भुलेश्वर मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविकांचा व पर्यटकांचा ओढा असल्याने त्यादृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना होणे गरजेचे आहे. शासन स्तरावर व जिल्हा परिषदेकडे माळशिरस ग्रामपंचायत सातत्याने यासाठी पाठपुरावा करत आहे.**
>
> **- आरती यादव, सरपंच, माळशिरस**

> **“ पर्यटकांनी निसर्ग सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी येताना आपल्या जीविताची काळजी घेत आवश्यक ते सुरक्षेच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. धोकादायक दरडींच्या ठिकाणी जाणे प्रकर्षाने टाळावे व निसर्गसौंदर्याचा आनंद घेत असताना कोणाचे नुकसान होणार नाही याची देखील काळजी घेण्यात यावी.**
>
> **- राजेंद्र गद्रे, माजी उपसरपंच, माळशिरस**

# वीर धरणाखालचा पूल धोकादायक; 65 वर्षांपासून देखभाल नाही

## सन 1958 मध्ये बांधण्यात आलेल्या या पुलाला आजपर्यंत एकदाही त्याचे ऑडिट, तपासणी अथवा डागडुजी करण्यात आलेली नाही.

**पुणे | प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र वीर (ता. पुरंदर) येथील वीर धरणाखालून वाहणाऱ्या निरा नदीवरील पूल सध्या अत्यंत धोकादायक स्थितीत आहे. सन 1958 मध्ये बांधण्यात आलेल्या या पुलाला तब्बल 65 वर्षे पूर्ण झाली असून, आजपर्यंत एकदाही त्याचे ऑडिट, तपासणी अथवा डागडुजी करण्यात आलेली नाही.

हा पूल पुणे आणि सातारा जिल्ह्याची सीमारेषा दर्शवितो. पुलाच्या अलीकडे पुणे, तर पलीकडे सातारा जिल्हा आहे. दररोज 24 तास, वर्षभर या पुलावरून अवजड व सामान्य वाहनांची वाहतूक सुरू असते. मात्र, सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही.

पूल नदीपात्रापासून अतिशय कमी उंचीवर असून, दोन्ही बाजूंना संरक्षक कठडे नाहीत तसेच दिशादर्शक फलक, रेडियम पट्ट्या नसल्यामुळे रात्रीच्या वेळी किंवा पूल पाण्याखाली गेला असताना अपघातांची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढते.

अनेकदा वाहने थेट नदीपात्रात कोसळल्याचे प्रकार घडले आहेत. वीर धरणातून पाणी सोडण्यात आल्यानंतर काही काळ पूल वाहतुकीसाठी बंद ठेवावा लागतो. सार्वजनिक बांधकाम अभियंता स्वाती दहिवाल यांच्याशी संपर्क करण्याचा पत्रकार व नागरिकांचा प्रयत्न वारंवार अपयशी ठरतो. त्यांच्याकडून फोन उचलण्याचेही सौजन्य दाखविले जात नाही, अशी जनतेमध्ये तीव्र नाराजी आहे.

श्रीक्षेत्र वीर (ता. पुरंदर) येथील वीर धरणाखालून वाहणाऱ्या निरा नदीवरील पूल सध्या अत्यंत धोकादायक स्थितीत आहे. सन 1958 मध्ये बांधण्यात आलेल्या या पुलाला तब्बल 65 वर्षे पूर्ण झाली पुरंदर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागावर 'पालथ्या घड्यावर पाणी' अशी टीका होत आहे. धोकादायक पूल, धोकादायक झाडे किंवा इतर समस्या असो, अधिकाऱ्यांकडून कोणतीही प्रतिक्रिया मिळत नाही.




### पुलाचा इतिहास आणि सार्वजनिक दुर्लक्ष

**» धरणाचे काम सुरू असताना हा पूल बांधण्यात आला होता. धरण प्रशासनाच्या मालकीत असलेला रस्ता आणि पूल सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे सार्वजनिक वापरासाठी खुला ठेवण्यात आला आहे. मात्र, देखभालीबाबत विभागाचे दुर्लक्ष स्पष्टपणे जाणवते.**

### ग्रामपंचायतीची सातत्यपूर्ण मागणी

**» 'निरा नदीवरील हा अरुंद पूल वाहतुकीसाठी धोकादायक असून, पुलाची उंची वाढवून संरक्षक कठडे बसवावेत, यासाठी ग्रामपंचायतीकडून वारंवार मागणी केली जात आहे. पण, संबंधित विभाग याकडे सातत्याने दुर्लक्ष करतो आहे,' अशी नाराजी सरपंच मंजूषा धुमाळ यांनी व्यक्त केली.**